म.रा.वितरण कं. मर्या
उपविभाग - राजापूर
आवक क्र. 1428
दिनांक 8/9/15

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

( महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील )
CIN - : U40109MH2005SGC153645


फोन नं. - (०२३५२) २२२८६५
फॅक्स नं. - ०२३५२ - २२१०४१
E-mail : eeratnagari@ho.mahadiscom.in
Website: www.mahadiscom.in

कार्यकारी अभियंता (स.व.सु.)
विभागिय कार्यालय, रत्नागिरी.
प्रशासकीय इमारत,
नाचणे रोड, रत्नागिरी. ४१५६३९


नं. काअ/रत्ना/तां/नं. № 0 5 1 5 5 दिनांकः- 01 SEP 2015

प्रति,
श्री. मोहन रामचंद्र वैद्य,
मु. पो. शिवणे खुर्द
ता. राजापूर जि. रत्नागिरी.

विषय : शिवणे खुर्द येथे झालेल्या जळीत अपघातापोटी नुकसान भरपाई मिळणेबाबत
संदर्भ : १) शिवणे खुर्द येथे दि. ०२.०१.२०१४ रोजी झालेला अपघात.
२) या का. पत्र क्र. ५८५६ दि. ०६.०८.१४
३) आपले पत्र क्र. निरंक दि. १२.०६.१५

महोदय,

वरील विषयानुसार, दि. ०२.०१.१४ रोजी शिवणे खुर्द येथे झालेल्या जळीत अपघातापोटी नुकसान भरपाई प्रकरणी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत आपणांस या कार्यालयाकडून संदर्भ क्र. २ न्वये कळविण्यात आलेले होते. परंतु, आपण दि. १२.६.१५ रोजी सादर केलेल्या पत्रासोबत सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे मूल्यांकन न केल्यामुळे वा कोठेही नुकसानीच्या रकमेचा उल्लेख नसल्याने या कार्यालयास नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणे शक्य नाही. तरी आपणांस पुनःश्च खालील कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत कळविण्यात येत आहे.

१) अपघातग्रस्त जागेचे मागिल ३ वर्षांचे ७/१२ उतारे
२) तहसिलदार यांचे उत्पन्नाबाबत मागिल ३ वर्षांचे ७/१२ उतरे व परिसरातील सर्वसाधाराण उत्पन्नाबाबत व दराबाबतचा विचार करून होणारे नुकसान याबाबतचा तहसिलदार यांचा दाखला.
३) मंडल / विभागीय कृषी अधिकारी यांचा कलमांचे नुकसानीबाबतचा सविस्तर अहवाल.

आपण माहिती सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. तोपर्यंत आपला प्रस्ताव प्रलंबित राहील याची कृपया नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता,
रत्नागिरी.

प्रत :
१) उपकार्यकारी अभियंता, उपविभाग राजापूर १.
... सदर अर्जदाराकडून कागदपत्रांची पूर्तता आपले कार्यालयाकडे केल्यास सर्व कागदपत्रे व 'अर्जदाराकडे महावितरणची कोणत्याही स्वरूपाची थकबाकी नसलेबाबत' आपले स्वतंत्र पत्र या कार्यालयाकडे सत्वर सादर करावीत.

Scanned by CamScanner